International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# देशाच्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राची भूमिका एक अभ्यास

**प्रा.डॉ.मोहन बळीबा शिंदे.**

सहाय्यक प्राध्यापक, ॲड़.एम.एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर, 422604. (महाराष्ट्र राज्य ), भ्रमणध्वनी क्र.9423755165 / 8796922632,
ई.मेल.mohanshinde50@gmail.com

**गोषवारा**

जगात कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकास हा प्रामुख्याने तीन क्षेत्रावर अवलंबून आहे. तो म्हणजे एक प्राथमिक क्षेत्र जे शेतीशी संबंधित आहे तर द्वितीय क्षेत्र जे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाशी,व्यापाराशी संबंधित आहे,तर तृतीय क्षेत्र जे सेवा क्षेत्राशी संबंधित असे आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्र हे सर्वांत मोठे क्षेत्र म्हणून नावा रुपाला येत आहे. भारताच्या सन 1991 च्या नवीन आर्थिक धोरणापासून सातत्याने सेवाक्षेत्राची वृद्धी वेगाने होत आहे. 2001 सालापासून सेवाक्षेत्राचा वृद्धिदर 9 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. सन 2018-19 मध्ये भारतात कृषिक्षेत्राचा वृद्धिदर 2.9%, औद्योगिक क्षेत्राचा वृद्धिदर 6.9% आणि सेवाक्षेत्राचा वृद्धिदर मात्र 7.5% होता.

आज भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण अवस्थेतून म्हणजे शेती क्षेत्रातून उद्योग क्षेत्र तर उद्योग क्षेत्राकडून सेवाक्षेत्राकडे जात आहे. जगातील इतर विकसित देशांप्रमाणेच भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वांत वेगाने विकास साध्य करणारी अर्थव्यवस्था म्हणून गणली जात आहे. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा सतत घटत असून सेवाक्षेत्राचा वाटा सतत वाढताना दिसतो आहे. जागतिक पातळीवर सेवाक्षेत्राच्या बाबतीत जगात भारताचा सध्या 8 वा क्रमांक लागतो म्हणून **"देशाच्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राची भूमिका एक अभ्यास"** या शीर्षकाखाली अर्थशास्त्राचा एक अभ्यासक व संशोधक म्हणून प्रस्तुत शोध निबंधाचा विस्तृत शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मूळ शब्द :-** प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र, सेवाक्षेत्र,आर्थिक विकास, रोजगार निर्मिती,निर्यात व परकीय गुंतवणूक इत्यादी.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. सेवाक्षेत्र या संकल्पनेचा आढावा घेणे.
2. आर्थिक विकासात सेवाक्षेत्राची भूमिका काय आहे ? याचा अभ्यास करणे .
3. सेवाक्षेत्रातून रोजगार निर्मितीचा आढावा घेणे. इत्यादी.

**गृहीतके**

a. सेवा क्षेत्रातून देशात रोजगार संधी उपलब्ध होत आहे.
b. सेवा क्षेत्रामुळे प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासाला चालना मिळत आहे.
c. सेवा क्षेत्रामुळे देशाच्या आर्थिक विकासात भर पडत आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून शोधनिबंधातील विवेचन दुय्यम साधनसामग्रीवर अवलंबून आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, अहवाल ,वृत्तपत्रे व संकेतस्थळ इत्यादीचा उपयोग केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत शोध निबंधातून **"देशाच्या आर्थिक विकासात सेवाक्षेत्राची भूमिका एक अभ्यास "** यावर प्रकाश टाकणे हाच मुख्य हेतू आहे.त्यामुळे या शोधनिबंधातील निष्कर्ष इतर क्षेत्रासाठी लागू असतीलच असे नाही. हीच या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा असेल.

**प्रस्तावना**

सेवाक्षेत्र म्हणजे अर्थव्यवस्थेचे असे क्षेत्र की, ज्या भागात अमूर्त वस्तूंचे उत्पादन होते. युनायटेड स्टेट्स सेन्सस ब्यूरो यांच्या मते, सेवाक्षेत्रामध्ये प्रामुख्याने माहिती क्षेत्र सेवा, सुरक्षा, वस्तू आणि इतर वित्तीय गुंतवणूक सेवा, भाडे आणि भाडेपट्टा सेवा, धंदेवाईक, ट्रक वाहतूक,संदेश सेवा आणि गुदाम, शास्त्रीय आणि तांत्रिक सेवा, प्रशासकीय आणि आधारसेवा, अपव्यय व्यवस्थापन आणि प्रतिबंधक, सार्वजनिक प्रशासन, व्यापार, वित्तीय सेवा, विमा व्यवसाय, माहिती, सल्ला सेवा, किरकोळ व्यापार, बँका, उपाहार गृहे, स्थावर मालमत्ता, शिक्षण, आरोग्य इत्यादींचा समावेश होतो. तसेच सामाजिक मदत आणि कला, करमणूक आणि मनोरंजन सेवा, घरकाम, मानसोपचार पद्धती, कर, मार्गदर्शक सहली, रुग्णसेवा आणि अध्यापन आदींचा समावेश होतो.

**सेवाक्षेत्राची व्याख्या**

सेवा क्षेत्राची व्याख्या अभ्यासकांनी पुढील प्रमाणे केली आहे.

a. "तर्कशास्त्रीयदृष्ट्या वस्तू आणि सेवा या निरनिराळ्या प्रकारात मोडतात. जी उत्पादने अभौतिक किंवा अमूर्त वस्तू स्वरूपात असतात त्यांना सेवा असे संबोधतात."
b. "ज्या क्षेत्रात सेवा उत्पादित होतात त्या क्षेत्राला सेवाक्षेत्र असे म्हणतात."
c. "सेवा या तत्त्वतः भिन्न-भिन्न प्रकारच्या असतात. त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता नसते.

त्यांचा समावेश अमूर्त वस्तूमध्ये होतो." - **हील (1977)**

या प्रकारे सेवा क्षेत्राची व्याख्या अभ्यासकांनी केली आहे.

- **सेवा क्षेत्रांचे वर्गीकरण**

सेवा क्षेत्रांचे वर्गीकरण अनेक पद्धतींनी केले जाते. प्रत्येक पद्धतीत केलेले वर्गीकरण स्वतंत्र असल्याने ते पुढील प्रमाणे दिसतात.

**(1) अत्यावश्यक सेवा आणि साधारण सेवा :-**

अ) यात लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून पुरविल्या जाणाऱ्या सेवांना अत्यावश्यक सेवा असे म्हणतात. सरकार या सेवा पुरविते किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवते. उदा., पाणीपुरवठा, वीजपुरवठा, वैद्यकीय सुविधा, स्थानिक वाहतूक, अग्निशामक सेवा, सार्वजनिक स्वच्छता इत्यादी.

(ब) सर्वसाधारण सेवा ज्या सेवा अत्यावश्यक नाहीत त्यांना सर्वसाधारण सेवा असे म्हणतात, या सेवांचा पुरवठा बाजारयंत्रणेमार्फत केला जातो. उदा., विमा, वैद्यकीय सेवा.

**(2) सार्वजनिक सेवा आणि खासगी सेवा :-**

**(अ) सार्वजनिक सेवा :-**

सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा म्हणजे सार्वजनिक सेवा होय, या सेवांचा लाभ सर्वांना होतो. उदा. देशाचे संरक्षण, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, रस्ते, धरणे, वीज, शिक्षण, आरोग्य, वृक्षसंवर्धन इत्यादी.

**ब) खासगी सेवा :-**

बाजाराच्या माध्यमातून पुरविल्या जाणाऱ्या सेवांना खासगी सेवा असे म्हणतात. खासगी उद्योजक/व्यावसायिक शुल्क आकारून या सेवा ग्राहकांना पुरवितात. उदा. कायदेशीर सल्ला, दुरुस्ती सेवा.

**(3) व्यक्तिगत उपयोगाच्या सेवा आणि व्यावसायिक उपयोगाच्या सेवा :-**

**(अ) व्यक्तिगत उपयोगाच्या सेवा :-**

व्यक्तीची गरज विचारात घेऊन पुरविल्या जाणाऱ्या सेवांना 'व्यक्तिगत सेवा' असे म्हणतात. प्रवास, करमणूक, टिकाऊ उपभोग्य वस्तू दुरुस्ती व देखभाल, गृहसजावट, गृहरचना इत्यादी.

**(ब) व्यावसायिक उपयोगाच्या सेवा :-**

व्यवसायाची गरज विचारात घेऊन पुरविल्या जाणाऱ्या सेवांना 'व्यावसायिक सेवा' असे म्हणतात. उदा. वित्तसेवा, तांत्रिक सेवा, विमा सेवा, मालवाहतूक इत्यादी.

**(4) आर्थिक सेवा व सामाजिक सेवा :-**

**(अ) आर्थिक सेवा :-**

ज्या सेवांपासून प्रत्यक्ष उत्पन्न मिळविता येते. त्या सेवांना 'आर्थिक सेवा' असे म्हणतात. उदा., सिंचन, वीजपुरवठा, शिक्षण, आरोग्य.

**(ब) सामाजिक सेवा :-**

ज्या सेवांपासून प्रत्यक्ष उत्पन्न मिळत नाही त्या सेवांना ढोबळ मानाने 'सामाजिक सेवा' असे म्हणतात. उदा.,

माता व बालसंगोपन, सार्वजनिक स्वच्छता, झोपडपट्टी सुधारणा, कुटुंबकल्याण इत्यादी.
या प्रकारे सेवा क्षेत्राचे वर्गीकरण दिसून येते.

- **भारतीय अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राची भूमिका :-**

**(1) स्थूल देशांतर्गत उत्पन्नात वाढता हिस्सा :-**

अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने एखाद्या क्षेत्राची भूमिका किती महत्त्वाची आहे हे त्या क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पन्नात किती हिस्सा आहे यावरून ठरते. 1999-2000 च्या किंमतीनुसार सन 1950-51 मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात कृषी आणि संलग्न क्षेत्राचा वाटा 55.9%, उद्योग क्षेत्राचा वाटा 14.9% आणि सेवाक्षेत्राचा वाटा 29.2% होता. मात्र सन 1990-91 नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले. या धोरणाचा परिणाम म्हणून भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात कृषी व सहयोगी क्षेत्राचा वाटा सातत्याने घटत गेला आणि उद्योग व सेवाक्षेत्राच्या वाट्यामध्ये वाढ होत गेली. उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवाक्षेत्राचा वाटा वेगाने वाढला. सन 1990-91 मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा 32.2% होता. द्वितीय क्षेत्राचा हिस्सा 27.2% होता तर तृतीय क्षेत्राचा हिस्सा 40.6% होता. सन 2021-22 मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात तर सेवाक्षेत्राचा हिस्सा 54.40% पर्यंत वाढला, भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नात निम्म्यापेक्षा अधिक उत्पन्न सेवाक्षेत्रातून प्राप्त होते. चीनचा याच काळात स्थूल देशांतर्गत उत्पन्नात सेवाक्षेत्राचा वाटा 44% म्हणजे भारतातील सेवाक्षेत्राच्या हिश्यापेक्षा कमी आहे. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राची भूमिका उत्पन्न मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. अर्थात, जगातील विकसित देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात सेवाक्षेत्राचा हिस्सा 70% पेक्षा जास्त आहे. अर्थात हा पल्ला भारताला अजून गाठायचा आहे.

**(2) रोजगारनिर्मितीत वाटा** :-

भारतातील रोजगारनिर्मितीत शेतीक्षेत्र मागे पडताना दिसते तर सेवाक्षेत्रात मात्र रोजगार-निर्मितीच्या दरात वाढ होत आहे. व्यापार, हॉटेल, वाहतूक, साठवणूक, दळणवळण, बँकिंग विमा, स्थावर मालमत्ता, सामुदायिक आणि व्यक्तिगत सेवा तसेच बांधकाम क्षेत्र, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, भाग बाजार, चित्रपट व्यवसाय, जाहिरात, क्रीडा, कायदेविषयक सल्ला, प्रकाशन उद्योग, फलज्योतिष, प्रसारमाध्यमे इत्यादी क्षेत्रांत रोजगार संधी वाढायला भरपूर वाव आहे. भारतात आजही प्राथमिक क्षेत्रात प्रामुख्याने शेतीक्षेत्रात सर्वांत जास्त रोजगाराच्या संधी आहेत. परंतु अलीकडे शेतीक्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण घटत असून सेवाक्षेत्रातील रोजगारीत वेगाने वाढ होत आहे. सन 1993-94 मध्ये शेतीक्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण 63.9% होते तर सेवाक्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण 21.2% होते. सन 2018 मध्ये शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या प्रमाणात 44% पर्यंत घट झाली असून सेवाक्षेत्रातील रोजगारीमध्ये मात्र 31% पर्यंत वाढ झालेली आहे. शेती क्षेत्रातील रोजगार संधीत घट होत असताना नजीकच्या भविष्यकाळात सेवाक्षेत्रात नवीन रोजगारांच्या संधीत 70% वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली दिसते.अर्थात शेतीनंतर रोजगार-निर्मितीच्या बाबतीत भारतीय अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राचा दुसरा क्रमांक आहे.

**(3) आर्थिक विकास** :-

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास प्राथमिक, दुय्यम आणि तृतीय क्षेत्रांच्या उत्क्रांती व वृद्धीवर अवलंबून असतो. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेत स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा आणि रोजगारनिर्मिती यांचा विचार केला तर सेवाक्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. अलीकडील काळात देशामध्ये सेवाक्षेत्राचा विकास वेगाने होत आहे, उत्पादन, उत्पन्न आणि रोजगारीत सेवाक्षेत्राचा वाटा सतत वाढत आहे. सेवाक्षेत्राच्या विकासामुळे प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते. सेवाक्षेत्राची वृद्धी गेल्या तीन दशकात उच्च दराने होत असल्याने देशाला उच्च दराने आर्थिक विकासही साध्य करता आला आहे. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता क्षेत्र वेगाने वाढ झाली आहे.

**(4) निर्यात वृद्धी** :-

भारताच्या एकूण निर्यातीत सेवाक्षेत्राच्या निर्यातीचा वाटा सातत्याने वाढत आहे. भारतातून सॉफ्टवेअर सेवांची मोठ्या प्रमाणात निर्यात होताना दिसते. सन 2017 मध्ये सॉफ्टवेअर सेवांच्या निर्यातीतून भारताला 185 ते 190 महापद्म डॉलर्स एवढे परकीय चलन प्राप्त झाले. जगातील विविध देशांना माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रासाठी कुशल श्रमिकांचा पुरवठा भारतातून केला जातो. भारत सरकारने सेवाक्षेत्राच्या निर्यातीवरील अनेक बंधने हटवलेली आहेत. भारत सरकारने 12 सर्वोत्कृष्ट सेवांच्या निर्यातीसाठी 5,000 कोटी रुपयांचे पॅकेज दिलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माहिती-तंत्रज्ञान, पर्यटन, आतिथ्य या सेवांचा अंतर्भाव आहे. भारत सेवांची निर्यात करणारा जगातील एक प्रमुख देश बनला आहे. सेवांच्या निर्यातीत जगात भारताचा 6 वा क्रमांक आहे. सन 2013-14 मध्ये सेवाक्षेत्राच्या निर्यातीपासून भारताला 152 महापद्म बिलियन अमेरिकन डॉलर्स प्राप्त झाले. यामध्ये सॉफ्टवेअर क्षेत्राच्या निर्यातीचे प्रमाण सेवाक्षेत्राच्या एकूण निर्यातीच्या 46% होते. 28 मार्च, 2019 रोजी भारताच्या वस्तू आणि सेवांच्या निर्यातीचे मूल्य 540 महापद्म डॉलर्स होते. त्यामध्ये सेवाक्षेत्राच्या निर्यातीचे मूल्य 200 महापद्म डॉलर्स होते.

**(5) परकीय गुंतवणूक** :-

भारतात 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रींचा अवलंब केल्यानंतर उद्योग आणि सेवाक्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात वाढला. सेवाक्षेत्रात परकीय गुंतवणुकीचा वेग वाढल्यामुळे सेवाक्षेत्राचा वृद्धिदर वाढून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात सेवाक्षेत्राचा हिस्सा वाढत गेला. एप्रिल 2000 ते मार्च 2019 या कालावधीत भारतात होणाऱ्या एकूण प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीपैकी 18% प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक सेवाक्षेत्रात झाली.तर2021-22 च्या पहिल्या सहामाहीत 16.73अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी थेट परकीय गुंतवणूक सेवा क्षेत्रात झाली.त्यामुळे कॉम्प्यूटर सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर, व्यापार, ॲटोमोबाइल उद्योग आणि रसायने या क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळाली.

वित्तीय क्षेत्र, बँकिंग, विमा, बाह्य स्रोत, संशोधन आणि विकास, कुरिअर सेवा, तंत्रज्ञान परीक्षण आणि विश्लेषण या क्षेत्रात गुंतवणूक मोठ्या प्रमाणात झाली. परकीय गुंतवणुकीच्या प्रवाहामुळे व्यवहारतोलाच्या परिस्थितीत सुधारणा झाली. अमेरिकन डॉलर्सच्या तुलनेत रुपयाचे मूल्य मजबूत झाले.

**(6) सरकारला उत्पन्न :-**

सेवाकर हा अप्रत्यक्ष कर असून या कराच्या माध्यमातून केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. फायनान्स ॲक्ट 1994 सेक्शन 65 नुसार हा कर 1994 पासून लागू करण्यात आला. हा कर व्यक्तिगत पातळीवर आणि कंपन्यांना आकारला जातो. हा कर प्रथम सेवा पुरविणारे सरकारला देतात आणि सेवा खरेदी करणाऱ्या ग्राहकांकडून सेवाकराची वसुली केली जाते. उपाहारगृह, अतिथी गृह, केबल सेवा पुरविणारे यांच्याकडून हा कर वसूल केला जातो. सुरुवातीला सेवाकराचा दर 14% होता. 1 जून, 2016 पासून सेवाकराचा दर 15% करण्यात आला. 2016-17 या वर्षामध्ये सरकारच्या कर उत्पन्नात 20.2% वाढ झालेली आहे. 2017-18 या आर्थिकवर्षामध्ये सेवाकरापासून केंद्र सरकारला ₹ 81,222 कोटी कर उत्पन्न प्राप्त झाले. या उत्पन्नाचा विनियोग सरकार विकासाच्या योजना राबविण्यासाठी करते.

**(7) प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासाला चालना :-**

अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्रातील कार्यव्यवहारामुळे प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात वस्तूंच्या उत्पादन वाढीला प्रत्यक्ष मदत होत नसली तरी प्राथमिक व दुय्यम क्षेत्रातील उत्पादन प्रक्रियेला आधार प्राप्त होतो. प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात श्रमिक, कच्चामाल, अंतिम वस्तू यांची ने-आण करण्यासाठी ट्रक, रेल्वे वॅगन्स यांचा वापर केला जातो.

प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात विविध प्रकारची कार्ये पार पाडण्यासाठी उद्योगांची स्थापना, विस्तार, कच्चामाल खरेदी, वेतन देणे यासाठी लागणाऱ्या कार्यकारी व स्थिर भांडवलाचा पुरवठा बँका व वित्तीय संस्थांमार्फत केला जातो.

प्राथमिक व दुय्यम क्षेत्रात मानवनिर्मित अथवा नैसर्गिक कारणामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा विमा उतरविल्यामुळे शेतकरी, कारखानदार यांना आपत्तीच्या काळात मदत प्राप्त होते.

थोडक्यात, सेवाक्षेत्राच्या मदतीशिवाय प्राथमिक व दुय्यम क्षेत्रातील व्यवहार योग्य पद्धतीने कार्यरत होत नाही. हे तितकेच खरे आहे.

**(8) दळणवळण** :-

व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी, वस्तूचा साठा, पुरवठा याबाबतची माहिती भ्रमणध्वनी, इंटरनेटच्या माध्यमातून उत्पादक व ग्राहकांना उपलब्ध होते.वरील सर्व सेवा सेवाक्षेत्र पुरविते त्यामुळे प्राथमिक व दुय्यम क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते. उत्पादनात वाढ होऊन व्यापार वृद्धिंगत होतो.

**(9) आर्थिक व सामाजिक समस्यांची सोडवणूक** :-

आर्थिक संधीच्या कमतरतेमुळे भारतात अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न निर्माण झालेले आहे. यामध्ये प्रामुख्याने दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता या प्रश्नांचा समावेश होतो. आर्थिक सुधारणा काळात भारतात सेवाक्षेत्राचा विस्तार झाल्यामुळे दारिद्र्य, बेकारी हे प्रश्न सोडविण्यास काही प्रमाणात मदत झालेली आहे. 2004-05 मध्ये भारतातील 37% लोकसंख्या दारिद्र्यरेषे खाली होती. सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे शहरी आणि ग्रामीण भागात रोजगार संधी उपलब्ध झाल्यामुळे दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांच्या उत्पन्न पातळीत वाढ झाली, सेवाक्षेत्राच्या विकासामुळे देशातील मध्यमवर्गीयांच्या संख्येत वाढ झाली. मध्यम-वर्गीयांची संख्या

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

वाढल्यामुळे मागणीची पातळी वाढली. गरीब लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्न पातळीत वाढ झाली. त्यामुळे दारिद्र्याच्या समस्येची तीव्रता काही प्रमाणात घटली.

**(10) उत्पन्न विषमतेत घट** :-

भारतात एका बाजूला श्रमिकांचा अतिरिक्त पुरवठा आहे तर दुसऱ्या बाजूला भांडवलाचा तुटवडा आहे. सेवाक्षेत्रात व्यवसाय सुरू करताना कमी भांडवल लागते तसेच कमी जागेत व्यवसायाची सुरुवात करता येते. आहे ते कौशल्य वापरून सेवा पुरविता येतात. सेवाक्षेत्रात कमी भांडवलाचा वापर करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करता येतो. त्यामुळे श्रमिक वर्गाच्या उत्पन्न पातळीत वाढ होऊन गरीब लोक आर्थिक दृष्ट्या सक्षम होतात. उत्पन्न व संपत्तीच्या वाटणीतील विषमता कमी होते. भारतासारख्या भांडवल टंचाई असणाऱ्या देशात आर्थिक विषमतेची तीव्रता कमी करण्यासाठी व उत्पन्न वाटणीतील विषमता कमी करण्याच्या दृष्टीने सेवाक्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे.

**(11) संतुलित प्रादेशिक विकास** :-

भारतामध्ये देशातील विविध राज्यांमध्ये,राज्या-राज्यातील विविध प्रदेशांमध्ये, शहरी क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्रांमध्ये प्रादेशिक विषमता फार मोठया प्रमाणावर आहे. सेवाक्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी अल्प भांडवल व कमी जागा आवश्यक असल्याने देशाच्या मागास भागात आणि ग्रामीण भागात विविध सेवा व्यवसाय विकसित करून प्रादेशिक असंतुलन कमी करण्यास मदत झालेली आहे. त्या माध्यमातून देशाचा संतुलित विकास साध्य करता येतो. देशाच्या विविध भागांत सेवाक्षेत्राच्या कार्यव्यवहारांचा विस्तार करण्यास भरपूर वाव आहे. मागास व ग्रामीण भागात सेवाक्षेत्र विकसित झाल्यास प्रादेशिक असमतोल दूर होतो.

**(12) व्यवहारतोलाची समस्या :-**

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील व्यवहार तोलाचा विचार केल्यास दृश्य वस्तूंच्या निर्यातीच्या तुलनेत दृश्य वस्तूंच्या आयातीचे प्रमाण नेहमी जास्त असल्यामुळे व्यवहारतोलाच्या तुटीची समस्या गंभीर बनलेली आहे. अलीकडच्या तीन दशकात सेवाक्षेत्राचा झपाट्याने विकास झाल्यामुळे सेवाक्षेत्राच्या निर्यातीचे प्रमाण सतत वाढल्यामुळे भारताला सेवाक्षेत्राच्या निर्यातीपासून फार मोठया प्रमाणात परकीय चलन प्राप्त होत असल्यामुळे व्यवहारतोलातील तूट कमी करण्यास सेवाक्षेत्राच्या निर्यातीपासून मिळणाऱ्या परकीय चलनाची मदत झालेली आहे.

**(13) तांत्रिक विकासाला चालना** :-

सेवाक्षेत्राच्या विकासामुळे भारतात विविध क्षेत्रांत नवीन तंत्रज्ञानाच्या वापराला, ऑनलाइन व्यवहाराला, इंटरनेट, भ्रमणध्वनी वापरण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळालेली आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्तारामुळे बँकिंग, वित्तीय सेवा, वाहतूक, दळणवळण, व्यापार, खरेदी-विक्रीचे व्यवहार, माल पाठविण्याच्या सुविधा यामध्ये नवीन तंत्रज्ञान वापरल्यामुळे गैरव्यवहाराला आळा बसला, उत्पादनात प्रचंड वाढ झाली, आर्थिक व्यवहारांची गती वाढली, व्यवहारांमध्ये पारदर्शकता निर्माण झाली. कार्यक्षमता व उत्पादकता वाढली. कामगार कपातीमुळे उत्पादन खर्चात कापात झाली. उत्पन्न स्त्रोतात वाढ झाली इंटरनेटच्या वापरामुळे व्यवहारांचे कार्यक्षेत्र विस्तारले,

ग्राहक वर्गाला सेवा प्राप्त करण्यासाठी होणारा त्रास कमी झाला, सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे माहिती आणि ज्ञान क्षेत्राचा प्रचंड विस्तार आला.

**(14) पायाभूत सुविधा आणि दळणवळण सेवा** :-

वाहतूक आणि दळणवळण सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांच्या विकासात, विस्तारात आणि व्यवस्थापनामध्ये सेवाक्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. भारतासारख्या विकसनशील देशात पायाभूत सुविधांच्या विकासाला सर्वांत जास्त महत्व आहे. वाहतूक साठवणूक आणि दळणवळण क्षेत्राचा भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सन 2006-07 मध्ये 8% होता तर सन 2017-18 मध्ये हा वाटा 8.7% होता.

**(15) जीवनमानाचा उच्च दर्जा** :-

शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रांच्या विकासामुळे देशातील सेवांच्या दर्जामध्ये सुधारणा होते. संशोधन, उद्योजकता विकास, कौशल्य सुधारणा, तंत्रज्ञान विकास यांना चालना मिळाली. लोकांच्या राहणीमाना पातळीत वाढ आणि जीवनमानाचा दर्जा उंचावला त्यामुळे मानव विकास निर्देशांकातही वाढ होते. भारतात 1991 नंतर शिक्षण, आरोग्य या सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे भारताच्या मानव विकास निर्देशांक 1990 ते 2017 या काळात 427 वरून 640 एवढी वाढ झाली. ही वाढ 50% आहे.

- **सेवाक्षेत्राच्या वृद्धीस जबाबदार असणारे घटक :-**

आर्थिक उदारीकरणानंतर सेवाक्षेत्राचा वृद्धिदर वेगाने वाढला यासाठी पुढील घटक जबाबदार ठरले .

1. उत्पन्न पातळी आणि दरडोई उत्पन्न पातळीत वाढ झाल्यामुळे आरामदायी जीवनमान जगण्याची
2. प्रवृत्ती वाढली.
3. भारतात आरोग्य सेवांचा विस्तार झाल्यामुळे सरासरी आयुर्मान वाढले.
4. स्त्री-कामगारांच्या संख्येत झालेली वाढ.
5. गुंतागुंतीची आणि कार्यमग्न जीवन पद्धती वाढल्याने कर सल्लागार, कायदेशीर सल्लागार,
6. गुंतवणूक सल्लागारांची मागणी वाढली.
7. उत्पादित वस्तूचा वापर व दुरुस्तीची गरज वाढली.
8. भारतामध्ये विभक्त कुटुंब पद्धती उदयाला आल्यामुळे शिक्षण, आरोग्य, करमणूक, दूरसंचार, पर्यटन
9. या सेवांची मागणी वाढली.
10. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली मोठी क्रांती.
11. विमा व्यवसायाच्या वृद्धीला चालना मिळाली.इत्यादी

- **भारतीय सेवाक्षेत्रापुढील आव्हाने** (Challenges to Indian Service Sector) :-

भारताने 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्याने भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक संरचनात्मक बदल झाले. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राच्या वाट्यात प्रचंड घट झाली आणि सेवाक्षेत्राचा वाटा वाढत गेला.आज

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

भारतीय अर्थव्यवस्थेला शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हणण्याऐवजी सेवाप्रधान अर्थव्यवस्था असे संबोधले जात असले तरी या क्षेत्रास आज अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. त्यातील काही महत्त्वाची आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

1. कुशल मनुष्यबळाची असणारी कमतरता.
2. डिजिटलायझेशन, ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या नव्या तंत्रज्ञानांचा वेगाने विकास होत आहे. यामुळे पारंपरिक व्यवसाय,मॉडेल्समध्ये बदल होत आहे.
3. काही सेवा उद्योगांमध्ये कंत्राटी कामगारांची भरती केली जाते असल्याने शाश्वत रोजगारात असणारी अस्थिरता .
4. परकीय गुंतवणुकीवरील असलेले अवलंबित्व.
5. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आहे. नवीन स्टार्टअप्स आणि बहुराष्ट्रीय कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करत असल्याने स्थानिक उद्योगांसमोर टिकून राहण्याचे आव्हान आहे.
6. सरकारच्या धोरणांमध्ये वारंवार होणारे बदल,परवानगी आवश्यकता आणि कर प्रणालीतील गुंतागुंत.
7. ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा .
8. लहान आणि मध्यम उद्योगांसाठी महागडे तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीचा तुटवडा.
9. डिजिटल सेवांच्या वाढीसोबत सायबर हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. कंपन्यांना डेटा सुरक्षा आणि
10. गोपनीयतेसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत आहे.

10. शहरी आणि ग्रामीण सेवांत असलेली तफावत इत्यादी.

- **निष्कर्ष :-**

भारतीय सेवाक्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, परंतु त्याला वर दिलेल्या अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यावर मात करण्यासाठी सरकार आणि खासगी क्षेत्राने एकत्र येऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे. योग्य धोरणे, तंत्रज्ञानाची योग्य अंमलबजावणी, आणि कुशल मनुष्यबळ विकास यावर भर दिल्यास सेवाक्षेत्राला अधिक बळकटी देता येईल.

- **शिफारशी :-**

भारतासारख्या विकसनशील देशात सेवा क्षेत्राचा GDP, रोजगार निर्मिती, निर्यात आणि संपूर्ण आर्थिक विकासात मोठा वाटा आहे. सेवा क्षेत्राच्या भूमिके संदर्भात संशोधकाने खालील शिफारसी मांडल्या आहेत.

1. माहिती तंत्रज्ञान (IT) आणि IT-सक्षम सेवा (ITES) यांना चालना देण्यासाठी सरकारनेसक्षम अशी धोरणे आणावीत.
2. स्थानिक स्टार्टअप्स आणि नवीन तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीस प्रोत्साहन द्यावे.
3. डिजिटल पायाभूत सुविधा (इंटरनेट, डेटा सेंटर, AI, क्लाउड तंत्रज्ञान) मजबूत कराव्यात.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Commerce & Economics
Organized by R. V. Belose Education Foundation Dapoli
N. K. Varadkar Arts, R.V. Belose Commerce College, Dapoli
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

4. पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक वाढवून देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करावे.जेणे करून धार्मिक, ऐतिहासिक, वैद्यकीय आणि इको-टुरिझमला आणखी चांगली चालना मिळेल .
5. हॉटेल्स, ट्रान्सपोर्ट आणि टुरिझम गाईडसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण कराव्यात.
6. ग्रामीण भागात बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्राचा विस्तार वाढवावा.
7. डिजिटल पेमेंट्स आणि फायनान्शिअल टेक्नोलॉजी (FinTech) कंपन्यांना पाठबळ द्यावे.
8. औषधनिर्मिती उद्योगातील संशोधन आणि विकासासाठी गुंतवणूक वाढवावी.टेलिमेडिसिन आणि ई-हेल्थ सेवा वाढवाव्यात. ग्रामीण भागात लोकांना परवडतील अशा आरोग्य सुविधा वाढवाव्यात.
9. ऑनलाईन शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी अधिक सुविधा उपलब्ध कराव्यात. परदेशी विद्यार्थी आणि संशोधक वाढविण्यावर भर द्यावा .
10. नव्या कौशल्यांना प्रोत्साहन देऊन सेवा क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करावे.इत्यादी

- **संदर्भ सूची :-**

1. डॉ.सुनील उगले,डॉ.अमोल गायकवाड,डॉ.मनीषा आहेर भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन प्रथम आवृत्ती जून 2024.
2. डॉ.सुनील उगले,डॉ.एस.आर.जावळे डॉ.विजयकुमार वावळे भारतीय आर्थिक पर्यावरण जी.1 अर्थव्यवस्था निराली प्रकाशन प्रथम व द्वितीय आवृत्ती नोव्हें 2019, नोव्हें 2021
3. डॉ.सुनील उगले,डॉ.अमोल गायकवाड,डॉ.दीपक कारे, डॉ.मनीषा आहेर भारतीय आर्थिक धोरण -1 निराली प्रकाशन प्रथम आवृत्ती जून 2024.
4. Dr,SHILLY JOHN Indian Economy-1 Nirali Prakashan First Edition July 2024.
5. डॉ. सुरेखा भिंगारदिवे ,प्रा.महारूख खोसे,डॉ.संभाजी काळे प्रा.दिनेश घुगे भारतीय आर्थिक पर्यावरण प्रशांत प्रकाशन ऑगस्ट 2019 .
6. डॉ.किरण जी. देसले स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र-1 दीपस्तंभ प्रकाशन 11 आवृत्ती.
7. www.servicesector.india